# Maharashtra Times

## Inclusive growth

**Date: 21/08/2015 | Edition: Mumbai | Page: 09 | Source: Bureau | Clip size (cm): W: 21 H: 16**

**Clip: 1 of 1**


# सर्वसमावेशक आर्थिक विकासाचा मार्ग




**विशिष्ट प्रकारची पण पूर्ण सेवा न देणारी बँक म्हणून पेमेंट बँक ओळखली जाते. पेमेंट बँकेला ग्राहकाकडून मुदत ठेवी स्वीकारण्याची परवानगी आहे. कर्जे देण्यास अपात्र असली तरीही ही बँक सर्वसमावेशक आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल यात काहीच शंका नाही. म्हणूनच रिझर्व्ह बँकेने ११ कंपन्यांना पेमेंट बँका स्थापन करण्याची अनुमती दिली आहे...**

## पेमेंट बँकेची पार्श्वभूमी

- **२३ सप्टेंबर २०१३ :** रिझर्व्ह बँकेकडून नचिकेत मोर यांच्या अध्यक्षतेखाली कॉम्प्रिहेन्सिव्ह फायनान्शियल सर्व्हिसेस फॉर स्मॉल बिझनेसेस अँड लो इन्कम हाउसहोल्ड्स या समितीची स्थापना
- **७ जानेवारी २०१४ :** नचिकेत मोर समितीकडून पेमेंट बँक स्थापन करण्याची शिफारस
- **१७ जुलै २०१४ :** पेमेंट बँकेसाठी रिझर्व्ह बँकेकडून मार्गदर्शक तत्त्वांचा कच्चा आराखडा प्रसिद्ध
- **२७ नोव्हेंबर २०१४ :** पेमेंट बँकेसाठी मार्गदर्शक तत्त्वांचा अंतिम आराखडा प्रसिद्ध
- **१ जानेवारी २०१५ :** रिझर्व्ह बँकेने पेमेंट बँक सुरू करण्यास उत्सुक उद्योगसमूहांकडून अर्ज मागवले
- **४ फेब्रुवारी २०१५ :** आलेल्या अर्जांची रिझर्व्ह बँकेकडून छाननी, ४१ अर्ज स्वीकारले
- **२८ फेब्रुवारी २०१५ :** भारतीय पोस्ट खात्याला पेमेंट बँक सुरू करण्यास सरकारची परवानगी
- **१९ ऑगस्ट २०१५ :** ११ उद्योगांना पेमेंट बँक सुरू करण्यास रिझर्व्ह बँकेची अनुमती

## पेमेंट बँकेसाठी निकष

- किमान भांडवल १०० कोटी रुपये हवे.
- पहिली पाच वर्षे प्रवर्तकाचा हिस्सा किमान ४० टक्के हवा.
- खासगी बँकांसाठी

एफडीआयच्या असलेल्या नियमांनुसारच पेमेंट बँकांमध्ये एफडीआयला परवानगी.

- बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट,१९४९नुसार भागधारकांना मिळणार मतदानाचा हक्क.
- प्रथमपासूनच बँकेचे शाखा-जाळे असणे बंधनकारक.
- एकूण शाखांपैकी २५ टक्के बँकिंग सेवा न पोहोचलेल्या ग्रामीण भागात हव्यात.

## आगामी पेमेंट बँका

- आदित्य बिर्ला नुवो
- एअरटेल एम कॉमर्स सर्व्हिसेस
- चोलामंडलम डिस्ट्रिब्युशन सर्व्हिसेस
- भारतीय टपाल (पोस्ट) खाते
- फिनो पे टेक
- नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी (एनएसडीएल)
- रिलायन्स इंडस्ट्रीज
- दिलिप शांघवी (सन फार्मास्युटिकल्सचे प्रवर्तक)
- विजय शेखर शर्मा (पे टीएमचे सीईओ)
- टेक महिंद्र
- व्होडाफोन एम पेसा

## हे करणार.. हे नाही

- कर्जे देऊ शकणार नाहीत.
- एक लाख रुपये कमाल मुदत ठेव स्वीकारू शकतील.
- बचत खात्यावरील व्याजदराप्रमाणे व्याज देणार.
- मोबाइल फोनच्या साह्याने पैसे हस्तांतरण शक्य.
- बिल भरणा, विनारोकड खरेदी व फोनच्या साह्याने चेकविना व्यवहार शक्य.
- डेबिट कार्ड व एटीएम कार्ड देण्यास परवानगी.
- बँक खात्यात पैसा जमा करताना त्यासाठी शुल्क आकारणार नाहीत.
- प्रवाशांना फॉरेक्स कार्ड देणार.
- बँकांपेक्षा कमी दरात फॉरेक्स सेवा देणार.

## अर्थव्यवस्थेसाठी 'गेम चेंजर'

भागश: सेवा देणाऱ्या बँका प्रथमच देशात येणार आहेत. यामुळे देशाच्या सुदूर भागातही बँकिंग सेवा जाऊ शकणार आहे. यामुळे पारंपरिक बँकिंगची व्याख्या बदलणार आहे. केवळ रोखीत व्यवहार करणाऱ्यांना बँकिंग व्यवहार करण्यास यामुळे मदत मिळणार आहे. अशा प्रकारच्या पेमेंट बँका अन्य विकसनशील देशांत लोकप्रिय ठरल्या आहेत. केनियामध्ये या बँकांची लोकप्रियता शिखरावर गेली आहे.